साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११०

दैनिक
# साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी








वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १३ अंक : २७३ गुरूवार १४ मे २०२० मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये


# 'लोकमत'च्या विजय दर्डाला १०० कोटींची नोटीस



ॲड विवेक रामटेके
जेष्ठ विधीतज्ञ



रशिदखान पठाण
राष्ट्रीय सचिव,
मानवाधिकार सुरक्षा परिषद

* सुप्रिम कोर्टाच्या आदेशाचे खोटे वार्तांकन.
* कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाईचे संकेत.
* लोकमतच्या पत्रकाराला न्यायालयाने अटक वॉरंट काढून अटक केल्यामुळे चिडलेल्या लोकमतची खेळी अंगावर उलटली.
* सुप्रिम कोर्टाचे न्या. दीपक गुप्ता यांच्या साक्षात्कारामुळे लोकमत तोंडघशी



हाच तो कोळसा घोटाळ्यातील आरोपी, दलाल तसेच खोटे वृत्त प्रकाशित करून मोठ्या प्रमाणात खंडणी वसूल करणारा 'भामट्या' विजय दर्डा

*विशेष प्रतिनिधी / १३ मे*

**नवी दिल्ली :** दैनिक लोकमतचे संपादक विजय दर्डा व त्यांचे पत्रकार अखिलेश अग्रवाल यांच्या विरूद्ध ॲड. निलेश ओझा यांनी दाखल केलेल्या केसमध्ये न्यायालयाच्या आदेशाने पुसद पोलिसांनी पत्रकार अखिलेश अग्रवाल यांना अटक वॉरंटवर अटक करून वर्धा न्यायालयाच्या कोठडीत सुपूर्द केले होते. ते प्रकरण अजुनही न्यायप्रविष्ट आहे. त्या पूर्वग्रह दूषित भावनेतून विजय दर्डा यांनी दि. ७ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे खोटे वार्तांकन प्रकाशित करून इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. निलेश ओझा, मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशिद खान पठाण व इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र ॲन्ड गोवाचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले यांची बदनामी केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध भादंवि कलम ५००, ५०१, १९२, ४६९, ४७४, ४७१ r/w१२०(B) &३४ अंतर्गत फौजदारी आणि कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई तसेच १०० कोटी रु. नुकसान भरपाईची नोटीस दै. लोकमतला देण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सुप्रिम कोर्टात कोर्ट अवमानना प्रकरण SMCP No.02/2019 हे प्रलंबित होते. त्यामध्ये ॲड. निलेश ओझासह वरील तीन उत्तरवादी आणि ॲड. मॅथ्यु नेदुमपरा हे चौथे उत्तरवादी होते. सर्वोच्च न्यायालयाने असे आदेश दिले की, (१) वकिलांना कोणतीही प्रक्रिया न अवलंबता थेट कोर्ट अवमानना अंतर्गत शिक्षा देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. (२) सुप्रिम कोर्टाचे इतरही न्यायधीश हे चीफ जस्टीस ऑफ इंडिया म्हणजे सरन्यायाधीश यांच्या समकक्ष, बरोबरीचे आहेत म्हणून प्रत्येक न्यायाधीश हा सरन्यायाधीशांची परवानगी न घेता स्वत:हून कोणत्याही प्रकरणाची दखल घेऊन नोटीस काढू शकतो. (३) आरोपी जज स्वत:च्या विरोधात केस स्वत:च चालवू शकतो. त्यात कोणताही गैरकायदेशीरपणा नाही. (४) न्यायाधीशाने भ्रष्टाचार केला तरी त्याला भ्रष्टाचारी म्हणता येणार नाही. (५) **पी.एन.दुडा प्रकरणात (1988) 3 SCC 167'** मध्ये सुप्रिम कोर्टाने ठरवून दिलेला कायदा हा बंधनकारक नाही, त्याचे उल्लंघन केल्यामुळे केस रद्दबादल ठरत नाही. (६) कोर्ट अवमानना कायदा,१९७१ चे नियम सुप्रिम कोर्टाला लागू पडत नाही. त्यामुळे बेकायदेशिररित्या दाखल याचिकेवरही सुप्रिम कोर्ट शिक्षा देऊ शकतो. (७) न्यायाधीशाला कोणताही कागद, पुरावा स्वत:हून रेकॉर्डवर घेताना तो कुठुन प्राप्त झाला हे आदेशात लिहणे किंवा स्वत:ला साक्षीदार म्हणून तपासणे बंधनकारक नाही. (८) तीनही उत्तरवादी हे संशयाच्या आधारावर दोषी ठरतात की, त्यांनी संगणमताने अवमाननाकारक आरोप केले.

वरील सर्व निष्कर्ष हे सुप्रिम कोर्टाच्या वरिष्ठ संविधानपीठ आणि पुर्ण खंडपीठाने ठरवून दिलेल्या कायद्याविरुद्ध असल्यामुळे दोन न्यायाधीशांचे २७ एप्रिल २०२० चे आदेश अप्रभावी व निरस्त (Per-incuriam) ठरतात. त्यामुळे ते आदेश परत घेण्यात यावे याकरीता तीनही उत्तरवादींनी रिकॉल ऑफ ऑर्डर (Recall of Order) करीता याचिका दाखल केली.

**त्या याचिकेतील मुख्य मुद्दे खालिलप्रमाणे होते;**

(१) पूर्ण खंडपीठाने **बाळ ठाकरे - वि - हरीष पिंपळखुटे (2005) 1 SCC 254** प्रकरणात स्पष्ट केले की, **पी. एन. दुडा** प्रकरणातील कायदा हा सर्वांना बंधनकारक आहे व चीफ जस्टीस ऑफ इंडियाच्या परवानगीशिवाय इतर कोणत्याही न्यायाधीशास स्वत:हून कोर्ट अवमाननाची दखल घेता येणार नाही. या नियमांचे उल्लंघन करून काढलेली नोटीस व दिलेली शिक्षा ही रद्दबादल ठरते. बाळ ठाकरे यांची शिक्षा रद्द करण्यात आली होती. वरिष्ठ खंडपीठाच्या विरुद्ध लहान खंडपीठ निर्णय देऊ शकत नाही.

(२) संविधान पीठाने **'Campaign for Judicial Reforms (2018) 1 SCC 196'** मध्ये स्पष्ट कायदा ठरवून दिला की, सुप्रिम कोर्टाच्या कोणत्याही न्यायाधीशाने किंवा खंडपीठाने जर चीफ जस्टीस ऑफ इंडियाच्या परवानगी शिवाय कोणतेही प्रकरण दखल घेवून कोणतेही आदेश पारीत केले असेल तर त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येऊ नये असे सर्व आदेश निष्प्रभ व रद्दबादल ठरतात.

त्या आदेशानूसार २७ एप्रिल २०२० चे आदेश हे रद्दबादल ठरले आहेत.

(३) सुप्रिम कोर्टचे ७ न्यायमूर्तीच्या संविधानपीठाने **जस्टीस सी. एस. कर्णन (2017) 7 SCC 1'** पूर्ण खंडपीठाने **सुखदेव सिंग 1954 SCR 454, दीपक प्रल्हादका (2004) 5 SCC 217 देविंदर पालसिंग भुल्लर (2011) 14 SCC 770'** प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की, न्यायाधीशाने तो स्वत: पक्षकार, आरोपी किंवा अप्रत्यक्षरित्या संबंधीत असलेल्या प्रकरणात स्वत: कोणतेही आदेश पारीत करु नयेत किंवा स्वत:विरूद्ध आरोप करणाऱ्या तक्रारकर्त्यास कोर्ट अवमाननाची नोटीस काढू नये. असे कोणतेही आदेश जर पारित केले तर ते आदेश Judicial Bias या तत्वानुसार रद्दबादल ठरतील. वरील कायद्यानुसार सुप्रिम कोर्टाच्या सर्व न्यायाधीशांनी काम केले असून **ॲमीकस क्युरी वि. प्रशांत भुषण (2010) 7 SCC 592'** प्रकरणात तत्कालीन सरन्यायाधीश एस. एच. कपाडीचा यांनी त्यांच्या स्वत:विरूद्ध आरोप असल्यामुळे कोर्ट अवमाननाची नोटीसच्या आदेशावर सही केली नव्हती. नुकतेच सेवानिवृत्त झालेले सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी सुद्धा त्यांच्या विरुद्ध महिला कर्मचारीने केलेल्या आरोपाबाबतच्या प्रकरणातील आदेशावर सही करण्यास नकार दिला होता. **[2019 SCC OnLine SC 604]**

परंतू न्या. रोहिंटन नरीमन व न्या. विनीत सरण यांनी स्वत: आरोपी असतांना कोर्ट अवमाननाची नोटीस तक्रारकर्त्या विरुद्ध काढण्याचे आदेश दिल्यामुळे संपूर्ण आदेश हे रद्दबादल व निरस्त ठरतात.

दि. २७ एप्रिल २०२० च्या आदेशामध्ये वरील नियमांचा कोणताही उल्लेख नाही व संविधानपीठाच्या नियमांच्या विरुद्ध कायदा बनविण्याचा अधिकार सुप्रिम कोर्टच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाला नाही त्यामुळे **'Dawoodi Bohra (2005) 2 SCC 673'** प्रकरणातील कायद्यानुसार वरील दि. २७.४.२०२० चे आदेश गैरकायदेशीर व रद्दबादल (Per - Incuriam) ठरले आहेत.

(४) तुमच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या पूर्ण खंडपीठाने **पल्लव सेठ (2001) 7 SCC 549'** प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की, सुप्रिम कोर्टाने संविधानाचे कलम १२९ अंतर्गत कारवाईमध्ये सुद्धा **'कंटेम्पट ऑफ कोर्ट ॲक्ट,१९७१'** नुसारच कारवाई करावी. त्याच्याबाहेर जाऊन बेकायदेशीर दखल घेता येणार नाही. असाच कायदा **माहेश्वर पेरी (2016) 14 SCC 251'** आणी संविधानपीठाने सुब्रमण्यम स्वामी विरुद्ध **अरुण शौरी (2014) 12 SCC 344** प्रकरणात ठरवून दिला असून कनिष्ठ बेंच असलेले दोन न्यायाधीशांचे दि. २७ एप्रिल २०२० चे आदेशातील निष्कर्ष हे रद्दबादल व निष्प्रभावी ठरतात.

(५) संविधानपीठाने **सी. एस. कर्णन (2017) 7 SCC 1'** प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला की, जर तुमच्याकडे पुरावे असतील तर तो न्यायाधीश भ्रष्टाचारी आहे व त्याने दुष्ट हेतूने आदेश पारीत केले आहेत असे आरोप करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकांना आहे. हा कोर्ट अवमाननाचा गुन्हा होवू शकत नाही. **(असाच कायदा सुब्रमण्यम स्वामी (2014) 12 SCC 344 प्रकरणात दिला BAT आहे.)**

दुसरे संविधान पीठाने **बथीना रेड्डी AIR 1952 SC 149'** प्रकरणात स्पष्ट केले की, जर एखाद्या न्यायाधिशाच्या भ्रष्टाचाराचे पुरावे कोणत्याही नागरिकाकडे असतील तर त्याचे कर्तव्य आहे की, त्याने ते जनतेपुढे आणावे. न्यायपालीकेतील भ्रष्टाचाराबाबत लेख प्रकाशीत करणे हे भारतीय राज्यघटनेचे कलम ५१ (A) (h) नुसार प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. त्याला कोर्ट अवमाननाची कारवाईची धमकी देणे हे गैरकायदेशीर आहे. **[R.K. Jain (2010) 8 SCC 281].**

(६) **आर. आर. पारेख (2016) 14 SCC 1'** प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की, जर एखादा न्यायाधीश कायद्याविरुद्ध जाऊन बेकायदेशीर आदेश पारित करून कोणाला गैरफायदा किंवा हानी पोहचविण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा त्या न्यायाधीशाचे आदेशच त्याच्या भ्रष्टाचाराचा पुरावा असून कोणताही अतिरीक्त पुरावा देण्याची आवश्यकता नाही. अश्या न्यायाधीशांना बडतर्फ करण्यात यावे. परंतु दोन न्यायाधीशांनी वरील कायद्याविरुद्ध निष्कर्ष काढले की अतिरिक्त पुरावे द्यावे लागतील. म्हणून वरील 27 एप्रिल 2020 च्या आदेशाचे निष्कर्ष गैरकायदेशीर आहेत.

(७) **कोर्ट ऑन इट्स ओन मोशन वि. राम पिआरा कॉमरेड 1972 SCC OnLine P&H 277'** प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून देण्यात आला आहे की, जर एखादा न्यायाधीश कायद्याच्या नियमाविरुद्ध कोणतीही कारवाई चालवित असेल तर तो न्यायाधीश भ्रष्ट व अकार्यक्षम आहे असे आरोप करणे म्हणजे कोर्ट अवमानना होत नाही. अशा न्यायाधीशाची तक्रार करणे म्हणजे न्यायव्यवस्थेला चुकीच्या लोकांपासून वाचविण्याचा प्रयत्न आहे आणि अशा तक्रारीला कोर्ट अवमानना म्हणणे चुकीचे आहे.

असाच कायदा **हरीहर शुक्ला 1976 Cri. L.J. 507', राम सुरत सिंग 1969 SCC OnLine All 226'** प्रकरणात ठरवून दिला आहे.

(८) पुर्ण खंडपीठाने **डॉ. एल. पी. मिश्रा (1998) 7 SCC 379** प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला की जरी वकिलांनी किंवा कोणीही न्यायालयात न्यायाधीशांची कितीही घोर अवमानना व शिवीगाळ केली असेल तरीसुद्धा कोर्ट अवमानना कायद्यातील तरतुदीनुसारच चार्जेस

(उर्वरित पान २ वर)

# लघु उद्योगांना ३ लाखांपर्यंत विनातारण कर्ज मिळणार : अर्थमंत्री




*वृत्तसंस्था / १३ मे*

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करत स्वावलंबी भारत संकल्पाचा नारा दिला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वावलंबी भारत अभियान पॅकेज जाहीर केलं. २० लाख कोटी रुपयाचं हे पॅकेज आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज (१३ मे) पत्रकार परिषद घेत पंतप्रधान मोदी यांनी घोषणा केलेल्या २० लाख कोटी रुपयांच्या पॅकेजची सविस्तर माहिती दिली

* संकटात सापडलेल्या MSME साठी २० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे अर्थमंत्री
* MSME ला ३ लाख कोटी विना हमी कर्ज मिळणार : अर्थमंत्री
* पगाराच्या २४ टक्के रक्कम पीएफ खात्यात जमा केली जाणार, १५ हजार पेक्षा कमी पगार असणाऱ्यांना सरकारकडून दिलासा : अर्थमंत्री
* मध्यम, लघूद्योग आणि कुटीर उद्योगांसाठी विशेष योजना, या सर्वांना ३ लाख कोटींचं विनातारण कर्ज मिळणार, एक वर्ष कर्जाचा हप्ता भरण्याची गरज नाही : अर्थमंत्री
* सूक्ष्म, लघु आणि मध्यम, कुटीर, गृह उद्योगांसाठी तीन लाख कोटी रुपयांचे र्भननचाीचिन-र्कााि छोंसचौब (हमीमुक्त) कर्ज, चार वर्षांची मुदत : अर्थमंत्री
* जनधन खात्यातंर्गत पैसे देण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पाठवण्यात आले : अर्थमंत्री
* रेशन कार्ड नसणाऱ्यांनाही धान्य मिळणार, ७१ हजार मेट्रीक टन डाळीचं वाटप करण्यात आलं : अर्थमंत्री
* कृषी क्षेत्रात सुधारणा केली, आवाज योजना, उज्वला योजनाने फायदा करुन दिली, आयुष्मान योजनेने गरिबांना उपचारात मदत केली, देशात व्यवसाय करण्यात मदत झाली अर्थमंत्री
* स्वदेशी ब्रॅण्डना जगासमोर ओळख मिळवून द्यायची आहे, देशात पीपई किट, व्हेंटिलेटरचं उत्पादन होत आहे, लोकांच्या खात्यात थेट मदत पोहोचवली जात आहे अर्थमंत्री
* पंतप्रधानांनी देशासमोर आपला विचार ठेवला, या पॅकेजवर अनेक मंत्रालयांशी चर्चा झाली, या पॅकेजच्या आधारे देशाला स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न असेल अर्थमंत्री
* आत्मनिर्भरचा नेमका अर्थ काय? निर्मला सीतारमन यांनी चार दाक्षिणात्य भाषेत समजावला

**२० लाख कोटी रुपयांचं पॅकेज**

कोरोना संकंटाचा सामना करताना नव्या संकल्पानुसार पंतप्रधान मोदी यांनी विशेष आर्थिक पॅकेजची घोषणा केली. हे आर्थिक पॅकेज स्वावलंबी भारताचा संकल्प साकार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावेल. हे पॅकेज २० लाख कोटी रुपयांचं असेल, असे काल मोदींनी जनतेशी संवाद साधताना म्हणाले.

नुकतंच सरकारने कोरोना संकंटाशी संबंधित ज्या आर्थिक घोषणा केल्या होत्या, जे रिझर्व्ह बँकेचे निर्णय होते आणि आज ज्या आर्थिक पॅकेजची घोषणा होत आहे त्याला जोडलं तर हे पॅकेज जवळपास २० लाख कोटींचं पॅकेज आहे. हे पॅकेज भारताच्या जीडीपीचं जवळपास १० टक्के एवढे आहे. देशाच्या विविध वर्गांना यामार्फत आर्थिक सहकार्य मिळेल. २० लाख कोटी रुपयांचं हे पॅकेज २०२० मध्ये स्वावलंबी भारतच्या अभियानाला एक वेगळी गती देईल. स्वावलंबी भारतच्या संकल्पाला सिद्ध करण्यासाठी या पॅकेजमध्ये सगळ्या गोष्टींचा विचार करण्यात आला आहे. हे पॅकेज कुटीर उद्योग, गृह उद्योग, लघु उद्योग अशा अनेकांसाठी आहे.

देशातील नागरिकांसाठी दिवसरात्र झटणाऱ्या शेतकरी आणि श्रमिक मजुरांसाठी हे आर्थिक पॅकेज आहे. हे आर्थिक पॅकेज प्रामाणिकपणे टॅक्स भरुन देशाच्या विकासात आपलं योगदान देर्णा़या मध्यमवर्गीयांसाठी आहे. गेल्या सहा महिन्यात व्यवस्था सक्षम झाली. त्यामुळेच भारताच्या प्रत्येक गरिबापर्यंत केंद्र सरकारची आर्थिक मदत पोहोचली.